

## रयत शिक्षण संस्थेचे

## आर्टस्,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर,(बुर्ली)

**सांस्कृतिक विभाग** **दिनांक 9 मे 2020**

# पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी अहवाल

रामानंद नगर येथील आर्टस्,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज या महाविद्यालयामध्ये शनिवार दिनांक 9 मे 2020 रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणातील कर्मवीरांच्या अर्धपुतळा पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी.कदम व महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. महेंद्र आप्पा लाड आणि महाविद्यालय विकास विकास समिती सदस्य मा. जे.के बापू जाधव हे मान्यवर उपस्थित होते.

महात्मा ज्योतीराम फुलेंच्या विचारातून प्रेरित होऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. खेड्यापाड्यातील गरीब व मागास मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी महत्वपूर्ण प्रयत्न केले. शिक्षण क्षेत्रात कमवा आणि शिका योजना त्यांनी सुरू झाली. भारत सरकारकडून त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दिनांक 9 मे 1959 रोजी या थोर महामानवाची प्राणज्योत मावळली.

निष्पती : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवन कार्य प्रति सद्भावना प्रकट झाली कर्मवीरांच्या जीवन कार्याचा जागर झाला.

लाभार्थी: सात




कर्मवीर अण्णांच्या पुतळ्यास अभिवादन करताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य व मा.जे.के.बापू जाधव



कर्मवीर अण्णांच्या पुतळ्यास अभिवादन करताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य व मा.महेंद्र आप्पा लाड

प्रा. प्रतिभा गुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)